

# अलर्ट : 27, 28 डिसेंबर ला 'हिवसाळा' चा अटॅक

## पावसासह गारपिट व थंडीचे तिहेरी संकट | शेतीपिकाचे नुकसान टाळण्याकरिता शेतकऱ्यांना अलर्ट

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.24 )-** सध्या राज्यातील बहुतांश ठिकाणी थंडी कमी झाली आहे. काही भागांत ढगाळ वातावरण असून, पावसासाठी पोषक वातावरणाची निर्मिती झाली आहे. त्यामुळे अमरावतीसह राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे, तसेच काही भागांमध्ये गारपिट व थंडीची लाट असे तिहेरी संकट ओढवणार असल्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. ऐन हिवाळ्यात पावसाचे आगमन

होणार असल्याने पुन्हा एकदा नागरिकांना हिवसाळा अनुभवायला मिळणार आहे. दुसरीकडे शेतीपिकाचे नुकसान टाळण्याकरिता योग्य ते उपाययोजना करण्याचा अलर्ट शेतकऱ्यांना देण्यात आला आहे.

पुढील तीन दिवस राज्यामध्ये ढगाळ वातावरण राहणार असल्याचा अंदाज आहे, तसेच तुरळक ठिकाणी ढगांच्या गडगडाटासह किरकोळ पावसाची शक्यता आहे. विशेषतः अमरावती, अकोला, नंदुरबार, धुळे, जळगाव, नाशिक, नगर, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, वाशिम, गोंदिया, चंद्रपूर, नांदेड, परभणी या जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता आहे. येत्या 27 डिसेंबरला मध्य महाराष्ट्र व मराठवाडा, विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी किरकोळ गारपिटीचा इशारा दिला आहे. प्रामुख्याने नंदुरबार, धुळे, जळगाव, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अकोला, अमरावती, नागपूर, गोंदिया, वर्धा आणि वाशिम या जिल्ह्यांमध्ये गारपिटीची शक्यता आहे.

### थंडीची लाट प्रतिकुल हवामानापासून बचावासाठी जिल्हा प्रशासनाने सतर्क रहावे- विभागीय आयुक्त

हवामान खात्याच्या अंदाजानुसार 27 व 28 डिसेंबर दरम्यान विदर्भात मेघ गर्जनेसह वादळी वाऱ्यांचा पाऊस तसेच थंडीची लाट येणार असल्याचे वर्तविण्यात आले आहे. त्यानुषंगाने प्रतिकुल हवामानापासून नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने विभागातील सर्व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणांनी सतर्क राहून उपाययोजना कराव्यात, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय यांनी जिल्हा प्रशासनाला दिले. जिल्ह्यात कुठेही आपातकालीन स्थिती उद्भल्यास त्याठिकाणी तत्काळ मदत व बचाव दल पोहचेल यादृष्टीने नियोजन करावे, असेही त्यांनी सांगितले.विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात थंडीची लाट प्रतिकुल हवामानाच्या अनुषंगाने जिल्हास्तरीय उपाययोजना संदर्भात सविस्तर आढावा डॉ. पाण्डेय यांनी आज घेतला. यावेळी विभागातील पाचही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून



तसेच सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे, तहसीलदार सारंग ढोमसे प्रत्यक्षरित्या बैठकीला उपस्थित होते. डॉ. पाण्डेय म्हणाल्या की, हवामान खात्याकडून वादळी वाऱ्यांसह पाऊस व थंडीची लाट विदर्भात सर्वत्र येणार असल्याचा अंदाज वर्तविला आहे. त्यानुषंगाने प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणांनी थंडीच्या लाटेपासून बचावासाठी उपाययोजना कराव्यात. शितलहरीच्या प्रभावापासून संरक्षणासाठी उपाययोजना नागरिकांना माहिती होण्यासाठी 'काय करावे व काय करु नये' याविषयी वृत्तपत्रातून व्यापक प्रमाणात जनजागृती करावी. थंडीच्या लाटेपासून मनुष्य, पशुधन, शेतीपिकांचा बचाव करण्याबाबतही विविध उपाययोजनांची वृत्तपत्रांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात यावी. नागरिकांना तत्काळ बचाव सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी जिल्हास्तरावरील नियंत्रण कक्ष 24×7 कार्यान्वित करावे. तसेच सर्व संबंधितांचे संपर्क क्रमांकांची यादी क्षेत्रीय, तालुका कंट्रोल रुम व बचाव पथकातील कर्मचाऱ्यांना वितरीत करावी. जिल्ह्यातील सर्व क्षेत्रीय यंत्रणांनी मुख्यालयी उपस्थित राहावे. जिल्ह्यातील आपदा मित्र व आपदा सखी यांना प्रशिक्षण देऊन त्यांच्यामार्फत गावागावात थंडीच्या लाटेपासून बचावासाठी 'काय करावे व काय करु नये' याविषयी व्यापक प्रमाणात जनजागृती करावी, अशा सूचना विभागीय आयुक्तांनी यावेळी दिल्या.

### जिल्हा नियंत्रण कक्ष 24×7 कार्यान्वित ठेवा

वादळी पावसामुळे झाडांचे नुकसान किंवा मोठी झाडे उन्मळून पडणे, फांद्या तुटणे यासाठी व वाहतुकीचा रस्ता पूर्ववत सुरु करण्यासाठी अग्निशमन विभागाचे पथक तयार ठेवावे. अवकाळी पाऊस तसेच थंडीची लाट, नैसर्गिक वीज यामुळे होणारी जिवीत हानी टाळण्यासाठी आरोग्य यंत्रणा सज्ज ठेवण्यात यावी. अवकाळी पाऊस, वादळी वाऱ्यांमुळे वीज खंडीत झाल्यास वीज वितरण कंपनीच्या यंत्रणांना सज्ज ठेवावे. वीज पुरवठा खंडीत झाल्यास त्याठिकाणी पथक पाठविण्यात यावे. जिल्हा शोध व बचाव पथके सर्व सोयी-सुविधांनिशी व बचाव साहित्यांसह 24 तास सज्ज ठेवावीत. तसेच जिल्हा नियंत्रण कक्ष 24×7 कार्यान्वित ठेवावा, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. पाण्डेय यांनी जिल्हा प्रशासनाला दिले.

# बिबट मायलेकाची भेट घडवून आणण्याकरिता वनविभाग लागले कामाला

## आईपासून दुरावलेल्या बिबटच्या शावकाला केले रेस्क्यू



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.24 ) -** आईपासून दुरावलेल्या बिबट्याच्या शावकाला रेस्क्यू करून पिंजऱ्यात जेरबंद करण्यात अमरावती वनविभागाच्या चमुला यश मिळाले. 24 डिसेंबर रोजी दुपारी 1 ते 1.30 वाजताच्या सुमारास विद्यापीठ परिसरातील गेस्ट हाऊसच्या मागील भागात वनविभागाचे हे रेस्क्यु ऑपरेशन चालले. या बिबट मायलेकाची भेट घडवून आणण्याकरिता वनविभाग कामाला लागले आहे.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या मागील परिसर जंगलाने वेढला असून, या परिसरात तलाव सुध्दा आहे. त्यामुळे जंगलातील वन्यप्राणी अनेकदा विद्यापीठाच्या आवारात सुध्दा शिरतात. मंगळवारी सकाळी विद्यापीठातील सुरक्षा रक्षक आपले कर्तव्य बजावत असताना, त्यांना विद्यापीठाच्या सर्वात शेवटच्या भागात असणाऱ्या युजीसी-एमएमटीआयसी गेस्ट हाऊसमधील तारेच्या कंम्पाऊटच्या आत बिबटचे एक शावक भिंतीजवळ दडून बसले असल्याचे दिसून आले. सुरक्षा रक्षकांनी ही माहिती विद्यापीठाच्या प्रशासकीय अधिकार्यांना दिली. त्यानंतर या घटनेची माहिती अमरावती वनविभागाच्या रेस्क्यु पथकाला देण्यात आली. या माहितीवरून अमरावती वनविभागाचे उपवनसरंक्षक धैयशिल पाटील यांच्या मार्गदर्शनात वनरक्षक अमोल गावनेर व वनमजुर यांच्यासह वन्यप्रेमी सावंत देशमुख, जयंत वडतकर यांनी तत्काळ विद्यापीठातील घटनास्थळ गाठले. त्यावेळी बिबट हा गेस्ट हाऊस इमारतीच्या मागील बाजुस असणार्या भिंतीजवळ बसून असल्याचे दिसून आले. त्यानंतर रेस्क्यु टिमने बिबटच्या शावकाला फिजीकल रेस्क्यु करण्याचे ठरविले. त्यानंतर अर्धा तासाच्या रेस्क्यु ऑपरेशननंतर बिबटच्या शावकाला पिंजऱ्यात जेरबंद करण्यात रेस्क्यु पथकाला यश मिळाले. या बिबटच्या शावकाला वडाळी वनपरीक्षेत्र परिसरात ठेवण्यात आले होते. दरम्यान या परिसराला तारेचे कंम्पाऊट असल्याने बिबटच्या शावाकाला बाहेर निघता आले नाही. त्यामुळे ते तेथेच अडकून थांबले असावे, अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे. त्याला त्याच्या नैसर्गिक अधिवासात सोडण्याची तयारी वनविभागाने सुरु केली होती.

> "सात ते आठ महिन्याचे बिबटचे शावक हे सांयळाळी आईसोबत आत शिरले असेल, त्यानंतर त्याची आई निघून गेली आणि तो तारेचे कंम्पाऊटच्या आतच राहिला असेल. पिल्लु तारेमुळे बाहेर जाऊ शकले नाही. दरम्यान सकाळी सुरक्षा रक्षकांना बिबटचे पिल्लु आत दिसले. त्यांनी वनविभागाला माहिती दिली. दुपारी 1.30 वाजता फिजीकली रेस्क्यु करून, शावकाला पिंजर्यात पकडण्यात आले. त्याला नैसर्गिक अधिवासात सोडण्यात येईल.
>
> **अमोल गावनेर, वनरक्षक**

# असदपूर येथे घरफोडी प्रकरणात शेजाऱ्याला अटक

## 34 हजार रुपयांचा माल जप्त, ग्रामीण गुन्हे शाखेची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर,( दि.24 )-** तालुक्यातील असदपूर येथील एका बंद घराला लक्ष्य करून रोख व दागिन्यांसह 1 लाख 25 हजार रुपयांचा ऐवज चोरी करणार्या एका शेजार्याला ग्रामीण गुन्हे शाखेने 23 डिसेंबर रोजी अटक केली आहे. कार्तिक मधुकर मुंडाने (24, असदपूर, अचलपूर) असे अटक केलेल्या चोरट्याचे नाव आहे.

असदपूर येथील जुनेद जकी खान अजमत खान हे 13 डिसेंबर रोजी कुटुंबासह बहारगाव येथे गेले होते. दरम्यान, अज्ञात चोरट्याने घर फोडून 60 हजार रुपयांची रोकड व 62 हजार रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने असा एकूण 1 लाख 25 हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. याप्रकरणी जुनैद झाकी खान यांनी आसेगाव पूर्णा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती. याप्रकरणी ग्रामीण गुन्हे शाखेचे पथक तपास करत होते. दरम्यान आरोपी कार्तिक मुंडाणे चोरीचे पैसे खर्च करत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी तत्काळ असदपूर येथे जाऊन कार्तिक मुंडाणे याला अटक केली. पोलिसांनी चोरीबाबत चौकशी केली असता तो उडवाउडवीची उत्तरे देत होता. पोलिसांनी कसुन चौकशी केली असता, त्याने चोरीची कबुली दिली.

### स्मार्ट वॉचसह मोबाईल केला खरेदी

चोरलेल्या पैशांमधून कार्तिकने नवीन स्मार्ट मोबाईल फोन, हेडफोन, हॅण्डवॉच खरेदी केले होते. या साहित्यासह 34 हजार 200 रुपये असा एकूण 34 हजार 200 रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. कार्तिकला आसेगाव पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. कार्तिक कुटुंबासह बाहेरगावला जात असल्याची माहिती जुनेद जकीला होती. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अप्पर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या आदेशावरून ग्रामीण गुन्हे शाखेचे किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक सचिन पवार, पोलीस अधिकारी युवराज मनमोठे, रवींद्र वऱ्हाडे, स्वप्नील तंवर, सागर नाठे, शांताराम सोनोने, चालक संजय प्रधान यांनी केली.

# महिला मजुरांनी भरलेला ऑटो उलटला

- 6 महिला गंभीर जखमी
- महाराणा प्रताप चौकातील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे, ( दि.24 ) -** मजुरीसाठी जाणाऱ्या महिलांचा ऑटो उलटल्याची घटना मंगळवारी सायंकाळी धामणगाव रेल्वेच्या वीर शिरोमणी महाराणा प्रताप चौकात घडली. या अपघातात सहा महिला जखमी झाल्या आहेत. मंगळवारी सायंकाळी 4 वाजताच्या सुमारास हा अपघात घडला.

मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी सायंकाळी 4 वाजताच्या सुमारास महिला मजुर ऑटोने जात असताना, वीर शिरोमणी महाराणा प्रताप चौकात ऑटो उलटला. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या महिला मजुरांमध्ये सुचित्रा बोरसरे (35), गंगा मनोहर पांढरे (50), बिंदा शेंडे (62), शकुंतला पेंदाम (70), शांता बेले (80) आणि शोभा अर्जुन (70) यांचा समावेश आहे. ऑटोमध्ये एकूण 13 महिला मजूर प्रवास करत होत्या. यामध्ये 6 महिला गंभीर जखमी झाल्या असून 7 महिलांना किरकोळ दुखापत झाली आहे. अपघातातील जखमींना प्राथमिक उपचारासाठी धामणगाव रेल्वे ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले आहे. प्राथमिक उपचारानंतर सहा महिला मजुरांना पुढील उपचारासाठी यवतमाळ येथे रेफर करण्यात आले आहे.

# कारच्या आडवा आला रोही

## अपघातात पाच जण जखमी



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.24 )-** भरधाव कारसमोर रोही आडवा येऊन झालेल्या अपघातात पाच जण जखमी झाले. ही घटना सोमवारी रात्री 11 वाजताच्या सुमारास अर्जुन नगर चौकाच्या समोरील रस्त्यावर घडली. या अपघातात कारमधील कल्पना हेमंत घाटोळे (52), रवींद्र नामदेवराव घाटोळे (62), कार चालक पवन रवींद्र काकडे (25), हेमंत रामचंद्र घाटोळे (63) व अरुणा अतुल घाटोळे (45) (सर्व रा. वरुड) असे पाच जण जखमी झाले.

घाटोळे कुटुंबातील सदस्य कारने अमरावती येथील मिश्रा यांच्या मुलाच्या लग्न समारंभात अमरावतीत आले होते. लग्नाचा कार्यक्रम आटोपल्यानंतर ते जाण्यासाठी निघाले. त्यांच्या कारमध्ये घाटोळे कुटुंबातील सहा जण व ड्रायव्हर उपस्थित होते. ते अमरावतीवरून निघाले असता, अर्जुन नगर चौकाच्या समोरच रस्त्यावर अचानक रोही आडवा आल्या आणि त्यांची एमएच 11 एके 1133 या क्रमांकाची कार अनियंत्रीत होऊन अपघात घडला.

या अपघातात ड्रायव्हरसह पाच जण जखमी झाले, तर दोघांना कुठलाही मार लागलेला नाही. या घटनेनंतर काही नागरिकांनी कारमध्ये बसलेल्या जखमींना तत्काळ औषध उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनांची माहिती गाडगे नगर पोलीसांना देण्यात आली. पुढील तपास गाडगे नगर पोलीस करत आहे.

# वरुडात पतंगीसोबत राजरोसपणे उडतोय नायलॉन मांजा?

## विक्रेत्यांवर कारवाई करण्याची नागरिकांची मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.24 ) -** येत्या काही दिवसावर मकर संक्रांतीचा सण येऊन ठेपला आहे. त्यानिमित्त सर्व दूर पतंग उडविण्याकरिता नायलॉन मांजा उडविण्याचे प्रमाण सुरू झाले आहे. या मांजामुळे काही लोकांचे गळा कापून जीव गेले आहे. त्यामुळे शासनाने या मांज्यावर बंदी आणली आहे. त्या बंदीचा काटेकोरपणे पालन व्हावे यासाठी पोलिसांनी पुढाकार घेऊन शहरातील मांजा उडविणाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी नागरिकांनी केली आहे. आता पोलीस प्रशासन मांजा उडविणाऱ्यावर कारवाई करणार का? याकडे मात्र सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष लागलेले आहे.



दरवर्षी डिसेंबरपासून तर जानेवारी, फेब्रुवारी महिन्यापर्यंत शहरातील नागरिक, तरुण मुलांचे नायलॉनच्या मांज्याने पतंग उडविण्याचे प्रमाण वाढले आहे. या मांज्यामुळे अनेकांचे जीव जाण्याची भीती निर्माण झाली आहे, यापूर्वी बरेच लोकांचा गळा कापून जीव सुद्धा गेला आहे. याची दखल शासनाने घेतलेली असून त्यासाठी अशा पतंग उडविण्याकरिता नायलॉन मांज्याचा वापर करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश पोलिसांना दिले आहे. त्यामुळे पोलिसांनी या आदेशाची अंमलबजावणी करून शहरातील अनधिकृत मांजा उडविणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी पुढाकार घ्यावा जेणेकरून सर्वसामान्य नागरिकांचे जीव जाणार नाही, अन्यथा कित्येक लोकांना आपल्या जीवाला मुकावे लागेल अशी परिस्थिती शहरात अशी घटना होवू नये, म्हणून पोलिसांनी सतर्क रहावे व मांजा उडविणाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# अमित शहांनी माफी मागत गृहमंत्री पदाचा राजीनामा द्यावा!

## जिल्हा काँग्रेसची मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.24 ) -** लोकसभेमध्ये संविधानावर चर्चा सुरु असताना देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान केला. याप्रकरणी त्यांनी संपुर्ण देशवासियांची माफी मागत आपल्या गृहमंत्री पदाचा राजीनामा द्यावी, अशी मागणी जिल्हा काँग्रेसने एका पत्रकार परिषदेतून केली आहे.



जिल्हा काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, भारताच्या संविधानाचा अमृतमहोत्सव राज्यसभेत सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये संविधानावर चर्चा सुरू असताना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा भाषणं देत असताना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी धक्कादायक टिप्पणी केली. ते म्हणाले की, 'वारंवार आंबेडकर म्हणण्याची फॅशन झाली आहे. जर त्यांनी देवाचे नाव इतक्या वेळा घेतले असते तर त्यांना सात जन्मांसाठी स्वर्ग जागा भेटली असती'. असे बोलून अमित शहांनी केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अपमान नाही तर थेट भारताच्या आत्म्याचा अपमान केला आहे. या भयावह वातावरणानंतरही भाजप आणि त्यांच्या नेतृत्वाने कोणताही पश्चाताप दाखवला नाही. पश्चातापाऐवजी, ते लाखो भारतीयांच्या रोषाला आणखी वाढवत आहेत. भाजप ची मानसिकता ही घटना भारतीय राज्यघटना विरोधी आहे हे मागील 10 वर्ष पासून दिसून येत आहे. भाजप दलितविरोधी, आरक्षणविरोधी भूमिका, समानतेच्या घटनात्मक तत्त्वांचे उल्लंघन करते असा आरोप काँग्रेसजनांनी यावेळी केला. या कृत्यांचा निःसंदिग्धपणे निषेध करत. संविधानाच्या मूल्यांचे आणि न्याय्य आणि सर्वसमावेशक दृष्टिकोनाचे रक्षण करण्यासाठी आम्ही स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी साकारलेला पवित्र अशा भारतीय राज्यघटनेच्या रक्षणासाठी आम्ही एकत्रपणे लढू, आम्ही काँग्रेस पक्ष्याच्या वतीने अमित शहा यांनी तत्काळ माफी मागावी, आणि गृहमंत्री पदाचा राजीनामा द्यावा अशी मागणी पत्रकार परिषदेतून खासदार बळवंत वानखडे, माजी मंत्री यशोमतीताई ठाकूर, माजी मंत्री डॉ.सुनील देशमुख, दिलीप एडतकर, किशोर बोरकर, बबलू शेखावत, जयश्री वानखडे, प्रवीण मनोहर, पंकज मेश्राम, हरिभाऊ मोहोड यांनी केली.

MIRAE ASSET
Mutual Fund

In order to impart an insight on mutual fund, to educate and create awareness among the investors about the financial market, Mirae Asset Mutual Fund undertakes numerous events and activities at various places across the country and in number of ways such as conducting Investor Awareness Programs (IAPs) / seminars, contents on investor awareness in print media (newspapers, magazines etc.) and programs on Mutual Funds in electronic media (TVs, radios etc.).

In this regard, please see below schedule of upcoming IAP:

| Date | Time | Address |
| --- | --- | --- |
| December 27, 2024 | 06:30 P.M. | Hotel VIRSA, Badnera Road, Guruchhaya Colony, Sai Nagar, Amravati - 444 607. |

**MIRAE ASSET MUTUAL FUND (Investment Manager: Mirae Asset Investment Managers (India) Private Limited.** CIN - U65990MH2019PTC324625**)**
**Registered & Corporate Office:** 606, 6th Floor, Windsor Building, Off CST Road, Kalina, Santacruz (E), Mumbai - 400098. ☎ 1800 2090 777 (Toll free), ✉ customercare@miraeasset.com www.miraeassetmf.co.in

**Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully.**

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# केंद्रीय मंत्री नितीन गडकरींशी अपुर्ण कामांवर केले खलबत

## बच्चू कडूंनी घेतली भेट / फिनले मिल, बैतूल, परतवाडा, अमरावती महामार्ग, चांदूरबाजार बायपास, पूलांच्या नूतनीकरणासाठी घातले साकडे

**महासागर प्रतिनिधी**

***चांदूर बाजार,( दि.24 )-*** *माजी आमदार बच्चू कडू यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची नागपूर येथे भेट घेत आपल्या कार्यकाळात झालेल्या विविध विकासात्मक कामातील रखडलेल्या कामासंदर्भात खलबत केले. अचलपूर येथील फिनले मील, परतवाडा ते अमरावती महामार्ग, पूलांचे नूतनीकरण, बहिरम ते बैतूल मार्ग व इतरही विकासात्मक बाबींसाठी त्यांना साकडे घातले. गडकरींनी ही कामे प्राधान्य क्रमाने मार्गी*

लावल्या जाणार असल्याचे आश्वासन यावेळी बच्चू कडूंना दिले.

अचलपूर विधानसभा मतदारसंघात कोट्यवधी रुपयांची विकासकामे माजी आमदार बच्चू कडू यांच्या कार्यकाळात करण्यात आली. त्याच कामांमध्ये काही कामे अपूर्ण असल्याने त्या संदर्भात माजी आमदार बच्चू कडू यांनी नागपूर येथे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन संबंधित कामे पूर्ण करण्यासंदर्भात चर्चा वजा विनंती केली. गडकरींनी सुद्धा या संपूर्ण कामांची माहिती घेत लवकरच ती कामे मार्गे लावणार असल्याचे आश्वस्त केले.



### शकुंतला रेल्वे सुरू करा

इंग्रज कालीन शकुंतला रेल्वे इतिहास जमा होण्यापूर्वी तिचे पुनर्जीवन करून गोरगरिबांसाठी महत्त्वाची असलेली ही रेल्वे सुरू करण्याची मागणी सुद्धा बच्चू कडू यांनी यावेळी केली. आपल्या कार्यकाळातील राहिलेले अनेक विषय पूर्ण करण्याची धावपळ कायम ठेवीत विकासात्मक कामात राजकारण नसल्याचे स्पष्ट करत त्यांनी ना गडकरी यांची भेट घेऊन चांदूरबाजार अचलपूर तालुक्यातील समस्या मांडल्या.

### फिनले मीलचे चाके कधी फिरणार ?

अचलपूर येथील फिनले मील गेल्या काही वर्षापासून बंद पडलेला आहे. मील बंद शेकडो कामगारांवर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळली आहे. अनेकदा यासंदर्भात निवेदने चर्चा आंदोलन बैठका सुद्धा झाल्या परंतु तोडगा निघत नाही. त्या संदर्भात नफ्यात असलेले या मिलला पुनर्जीवन देण्या सोबत रोजगाराचा रखडलेला मार्ग सुरू करण्याची मागणी करण्यात आली. त्याचप्रमाणे चांदूरबाजार ते परतवाडा शहरासाठी असलेला बायपास ला सुद्धा तत्काळ प्राधान्य देण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

### परतवाडा ते अमरावती मार्गाचे भिजतं घोंगळे

जिल्ह्यात सर्वाधिक वर्दळीचा परतवाडा ते अमरावती मार्ग विविध कारणामूळे रखडला आहे. बच्चु कडूंनी सांगितले की, आपल्या कार्यकाळात या मार्गाचे काम मार्गी लावण्याचा वारंवार प्रयत्न करण्यात आला. नागरिकांच्या निकडीचा प्रश्न असलेला हा मार्ग तातडीने सिमेंट कॉंक्रीटमध्ये रुपांतरित करण्याची मागणी नितीन गडकरी यांना बच्चू कडूंनी केली. त्यासोबतच परतवाडा ते चांदूरबाजार मार्गावरील कुरळ पूर्णा व तळेगाव मोहना येथील पुलाचे काम राहिले असून उर्वरित रस्त्याचे चौपदरीकरण झाले आहे. दोन्ही पुलाची काम प्राधान्याने करण्यात यावे. बळीराम बैतूल मार्गावरील अर्धवट राहिलेला मार्ग पूर्ण करण्याची मागणी यावेळी कडू यांनी खा.गडकरींना केली.

---

# हरदा येथे राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान

**महासागर प्रतिनिधी**

**धारणी,( दि.24 )** - तालुक्यांतील हरदा येथे 20 डिसेंबर शुक्रवार रोजी राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान कडधान्य हरभरा प्रकल्प अंतर्गत द्वितीय प्रशिक्षण व प्रधान मंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.



कार्यक्रमात प्रधान मंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग या विषयवार तालुका कृषि अधिकारी उमेश जाधव यांनी उपस्थित शेतकरी व लाभार्थ्यांना योजनेविषयी सविस्तर माहिती व मार्गदर्शन केले. तसेच हरिसाल मंडळ कृषि अधिकारी ठाकरे यांनी हरभरा पिकाचा वाढीची अवस्था या मध्ये घ्यावयाची काळजी व किडरोग व यावरिल उपाय योजने बाबत सविस्तर माहिती दिली.

सदर कार्यक्रमात मंडळ कृषि अधिकारी कडू यांनी हरभरा पिकाचे पाणी व्यवस्थापन या विषयी मार्गदर्शन केले व धारणी कृषि पर्यवेक्षक प्रदीप नीले यांनी जैविक किड नियंत्रण या विषयी सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन एस.एस.आकोसकर यांनी केले व आभार प्रदर्शन गावचे शेतकरी दशरथ धुर्वे यांनी केले.

# जे.टी. गायकवाड यांनी स्विकारला विभाग प्रमुखाचा पदभार

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर, ( दि.24 )** - नगर परिषद वीज विभागात जे.टी. गायकवाड यांनी विभाग प्रमुख म्हणून पदभार स्विकारला आहे. पदभार स्विकारताच शहरातील स्ट्रीट लाइटशी संबंधित समस्या सोडविण्यास त्यांनी प्राधान्य दिले.



स्ट्रीट लाईटशी संबधित तक्रार प्राप्त होताच गायकवाड यांनी स्वत: दिवसा आणि रात्रीच्या वेळेस विविध भागांत जाऊन स्ट्रीट लाइटच्या समस्यांचे निरीक्षण केले. त्यानंतर तत्काळ उपाययोजना केल्या. त्यांच्या या कार्यात लाइनमन रुपेश डकरे यांनी त्यांना पूर्ण साथ दिली. गायकवाड यांनी पदभार स्विकारल्यापासून अचलपूर शहरातील वारंवार बंद पडणाऱ्या लाईट्स, खराब सर्किट आणि केबलच्या समस्यांसारख्या मोठ्या अडचणी सोडवल्या आहेत. गायकवाड यांनी मुक्केरीपुरा, सरायपुरा, मोठी संगत आणि जोहरीपुरा अशा भागांमध्ये जाऊन स्ट्रीट लाइटची स्थिती पाहिली व बंद असलेल्या लाईट्स त्वरित सुरू करून घेतल्या. नागरिकांच्या तक्रारींवर ते तत्काळ कारवाई करत असल्याने स्थानिक लोकांमध्ये त्यांच्या कामाची प्रशंसा होत आहे. गायकवाड यांच्या सक्रिय आणि समर्पित कार्यपद्धतीबद्दल शहरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले. जे.टी. गायकवाड यांच्या कार्यशैलीने आणि समर्पणाने अचलपूर नगर परिषद वीज विभागाला नवी ओळख दिली आहे. त्यांच्या कामांमुळे शहरात विकासाच्या दिशेने सकारात्मक बदल होत आहे.

---

# शालेय क्रीडा महोत्सवात शिवाजी शाळेला घवघवीत यश



**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.24 )** - डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या शतकोत्तर रौप्य जयंती महोत्सवी वर्षानिमित्त श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा आयोजित शालेय क्रीडा महोत्सव 2024 अंतर्गत मोर्शी प्रभाग शालेय क्रीडा स्पर्धेचे आयोजन स्व. अण्णासाहेब कानफाडे स्मृती विद्यालय मोर्शी येथे आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यामध्ये शिवाजी उच्च माध्यमिक शाळा मोर्शी ने उत्कृष्ट कामगिरी करत प्रभागांमध्ये चॅम्पियनशिप प्राप्त केली.

व्हॉलीबॉल मुले व मुली वर्ग 8 ते 10 विजयी, कबड्डी मुले व मुली 8 ते 10 विजयी, खो खो मुले व मुली वर्ग 5 ते 7 विजयी, कबड्डी वर्ग 5 ते 7 मुले व मुली विजयी झाल्या. तसेच मैदानी स्पर्धेमध्ये 100 मीटर धावणे मुले प्रथम व द्वितीय, 400 मीटर धावणे मुले प्रथम व द्वितीय, गोळा फेक मुले प्रथम, गोळा फेक मुली प्रथम, लांब उडी मुले द्वितीय, लांब उडी मुली द्वितीय अशाप्रकारे घवघवीत यश प्राप्त केले. विद्यार्थ्यांच्या या अतुलनीय कामगिरीबद्दल शाळेचे मुख्याध्यापक श्रीकांत देशमुख, शाळा तपासणी अधिकारी निळकंठ यावले, उपमुख्याध्यापक आर.एच. जावरकर, पर्यवेक्षक यु.एम. गिद, एम.बी. ढाकुलकर तसेच क्रीडा शिक्षक विजय तारापुरे, अजय हिवसे, राजेश मुंगसे, अतुल वैद्य, प्रतीक उगले, अभी देशमुख, सुमित डेहनकर आदींनी अभिनंदन केले.



# प्रा. संजय बोचे आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर, ( दि.24 )** - श्री शिवाजी शिक्षण संस्थेव्दारे संचालित आदर्श विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक प्रा. संजय भिमराव बोचे यांना स्व. मामासाहेब कावडकर स्मृती आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. हा पुरस्कार श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारणी सदस्य हेमंतराव काळमेघ यांच्या हस्ते, केशवराव गावंडे, शाळेचे मुख्याध्यापक मनोज देशमुख व इतर मान्यवर यांच्या उपस्थितीत देण्यात आला. रत्नाबाई राठी हायस्कूल, दर्यापूर येथील सहाय्यक शिक्षक निलेश काळे यांच्या आर्थिक सहकार्याने या पुरस्काराचे वितरण केले जाते. प्रा. संजय भिमराव बोचे एक अतिशय निष्ठेने शैक्षणिक सेवा देण्यासाठी सदैव धडपडणारा विद्यार्थीप्रिय शिक्षक आहे. सुरुवातीला काही वर्ष तासिका तत्त्वावर काम करत त्यांनी आपल्या शैक्षणिक सेवेचा श्री गणेशा केला. त्यानंतर श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय, चिखली येथे आठ वर्षे व गेल्या आठ वर्षांपासून आदर्श कनिष्ठ महाविद्यालय, दर्यापूर येथे प्रामाणिक पणे सेवा देणारे प्रा.संजय बोचे एक हरहुन्नरी व्यक्तिमत्व आहे. उत्तम सूत्रसंचालक, प्रभावी वक्ता, सुश्राव्य गायक असे विविध क्षेत्रात आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या शिक्षकाची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे, असे मत डॉ. पंजाबराव देशमुख विचारमंचाचे राजेंद्र गायगोले यांनी याप्रसंगी व्यक्त केले.

# भाऊसाहेबांचे योगदान आजच्या शिक्षण प्रणालीवर प्रहार करणारे- शिक्षणाधिकारी

## शिवाजी शाळेत डॉ.पंजाबराव देशमुख जयंती उत्सवाचे थाटात उद्घाटन



**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी, ( दि.24 )**- शिक्षण महर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांनी समाजातील गोर गरीब व शोषित बहुजन समाजाच्या उद्धारासाठी शैक्षणिक क्षेत्रात दिलेले योगदान अमूल्य असून आजच्या महागड्या शिक्षण प्रणालीवर प्रहार करणारे आहे. या व्यवस्थेने भाऊसाहेबांचा आदर्श घेणे गरजेचे असल्याचे मत जिल्हा परिषद माध्यमिक विभागाच्या शिक्षण अधिकारी प्रिया देशमुख यांनी व्यक्त केले. त्या स्थानिक शिवाजी उच्च माध्यमिक शाळेत आयोजित डॉ.पंजाबराव देशमुख जयंती उत्सव, आरोग्य तपासणी शिबीर व शब्दांकुर हस्तलिखित विमोचनाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होत्या.

याप्रसंगी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सदस्य एन.एस.गावंडे तर प्रमुख अतिथी म्हणून नानासाहेब पाटील, प्रभाकरराव खोडस्कर, दिनेश अर्डक, शाळा समिती सदस्य अशोकराव पुंड, वामनराव झळके, आजीव सभासद शाळा निरीक्षक मधुकरराव रोडे, संजीवकुमार खाडे, जेष्ठ पत्रकार विकास पाटील, माजी मुख्याध्यापक सुदर्शन देशमुख, डॉ.गजानन पाटील, डॉ.सोज्वल पोहकार, शाळेचे मुख्याध्यापक श्रीकांत देशमुख, उपमुख्याध्यापक रवी जावरकर, पर्यवेक्षक मिलिंद ढाकुलकर, उध्दव गिद, शिक्षक प्रतिनिधी अशोक चौधरी, शिक्षकेत्तर प्रतिनिधी विठ्ठल गवई उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हर्षा पाटील यांनी तर आभार प्रदर्शन शीतल टोळे यांनी केले. कार्यक्रमाला विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### 28 डिसेंबर पर्यंत चालणार महोत्सव

23 ते 28 डिसेंबर 2024 पर्यंत शिक्षण महर्षी डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या जयंती उत्सव चालणार आहे. या जयंतीउत्सवानिमित्त प्रश्न मंजुषा, वेशभूषा स्पर्धा, व्याख्यान, विविध खेळ क्रीडा स्पर्धा, पाककला, रांगोळी, पुष्परचना, विज्ञान प्रदर्शनी या सारख्या विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती विद्यालयाचे मुख्याध्यापक श्रीकांत देशमुख यांनी दिली. या सर्व स्पर्धांचे बक्षीस वितरण दिनांक 28 डिसेंबर ला होणार असून दि. 26 डिसेंबर ला भव्य शोभायात्रे चे नियोजन सुद्धा करण्यात आले आहे.

---

# सोशल फोबियाची वाढती लागण!

## आभासी जगातच रमण्यावर भर



**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट, ( दि.24 )**- सोशल मिडीयाचे प्रमाण सध्या 10 ते 13 टक्क्यांपर्यंत फेसबुक, व्हॉट्सअप, इन्स्टाग्राम, यूट्यूब अशा सोशल मीडियाच्या आभासी जगात सध्या तरुण तासनतास हरवल्याचे चित्र पाहण्यास मिळतात. तर, दुसरीकडे चारचौघांमध्ये सामील व्हायला, बोलायलाही अनेक तरुणांना अवघड जाते. एवढेच काय तर लोकांमध्ये गेलो तर इतर लोक आपल्याबद्दल काहीतरी बोलतील, असेही अनेकांना वाटते. ही लक्षणे सोशल फोबियाची असून 18 ते 29 वयोगटातील तरुणांमध्ये त्याचे प्रमाण सध्या 10 ते 13 टक्क्यांपर्यंत आढळत आहे, अशी माहिती तज्ज्ञांनी दिली.

### काय घेता येईल काळजी

सोशल मीडियाचा वापर कमी करणे, स्क्रीन टाईमसाठी एक मर्यादा ठरविणे, काही दिवस सोशल मीडियापासून दूर राहणे, सामाजिक कार्यक्रमांमध्ये सहभाग घेणे, चारचौघांमध्ये मिसळणे, नवे मित्र जोडण्यावर भर ठेवणे.

### सोशल फोबियाचे गंभीर परिणाम

- नैराश्य, चिडचिड वाढणे
- अनाहूत गोष्टीची चिंता वाटणे
- स्वत:वर कमी विश्वास असणे

### सोशल मीडियाचे जडले व्यसन

सोशल मीडियावर ॲक्टिव्ह असलेले बहुतांश तरुण हे या आभासी जगातच जास्त रमत आहेत. मात्र, याचे व्यसन तर लागत नाही ना, याचीही दक्षता घेणे गरजेचे आहे. एकीकडे सोशल मीडियावर व्यस्त होताना या तरुणांमध्ये एकटेपणा वाढत चालला आहे. सामाजिक कार्यक्रमात सहभागी न होणे, मित्र-मैत्रिण, नातेवाइकांशी समोरासमोर संवाद टाळण्याचे प्रमाण वाढत चालले आहे.

### सोशल फोबिया म्हणजे काय ?

सोशल फोबिया एक असा आजार आहे ज्याची लक्षणे चटकन लक्षात येत नाही. या आजाराने ग्रस्त असलेल्या व्यक्ती लोकांपासून दूर पळतात. लोकांशी बोलायला घाबरतात. या व्यक्ती सर्वांसमोर येण्यास थोड्या लाजतात. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास देखील कमी होतो. लोकांना आणि समाजाला घाबरण्याच्या आणि त्यांच्यापासून दूर पळण्याच्या स्थितीलाच सोशल फोबिया म्हटले जाते.

### सोशल फोबियाची लक्षणे

एकत्र जमल्यावर इतरांशी संवाद साधायला लाज किंवा भीती वाटणे, इतरांद्वारे नकारात्मक मूल्यांकन होण्याची भीती नवीन लोकांना भेटून त्यांच्याशी बोलण्यात अडचण जाणवणे, सामाजिक कार्यक्रमात मिसळण्याचे टाळणे, एकल कोंडेपणात वाढ, घाम येणे, थरथरणे सामाजिक परिस्थितीची तीव्र भीती वाटणे.

# रुक्मिणीनगरात चौकीदाराला मारहाण

**अमरावती** - रुक्मिणीनगर येथे एका चौकीदाराला काठीने मारहाण करण्यात आली. अचलपुरातील जीवनपुरा येथील रहिवासी गणेश इंगोले (50) हे रुक्मिणीनगर येथे चौकीदार म्हणून काम करतात. बांधकामावरील मजूर सुरज हनुवते (27) व अमरसिंग खडसे (28) या दोघांनी त्यांना मोबाइल मागितला. मोबाइल न दिल्याने त्या दोघांनी त्यांना शिवीगाळ करून काठीने मारहाण केली. त्यांचा मोबाइल फोडून नुकसान केले. या प्रकरणी गणेश इंगोले यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.


## जाहीर सुचना

माझे अशील श्री भाऊराव बकारामजी पेठेकर यांची खालील मिळकतीचे मुळ खरेदी खत दि. ३०/०७/१९७९ र.द.क्र. २४३६ हे गहाळ झाले असून कोणास या बाबत माहिती असल्यास किंवा कोणास सापडली असल्या किंवा कुठे गहाण असल्यास त्यांनी खालील पत्यावर कळविणे किंवा आणुन देणे.

याद्वारे सर्वास कळविण्या येते की, या मिळकती बाबत वरिल दस्ताऐवज ला घेऊन कोणतेही व्यवहार करू नये व केल्यास माझे अशील होणाऱ्या नुकसानास जबाबदार राहणार नाही व त्यांच्यावर कुठलही बंधन राहणार नाही.

वरील मिळकती खरेदी संदर्भात कुठलीही आक्षेप/माहिती ७ दिवसात प्राप्त झाली नाही तर माझे अशील सदर मिळकतीचे दस्त गहाळ झाले असे समजून पुढिल कार्यवाही करतील याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

सदर मिळकत ही म.न.पा. अमरावती व दु.नि. अमरावती यांच्या अधिकारा खालील येत असून, याचा शे.स.क्र. ५४ पैकी नझूल शिट क्र. ५६, प्लॉट क्र. ५३९८ हे प्लॉट क्र. ४ याचे क्षेत्रफळ १४४.३७ चौ.मी. यावर राहते घर मौजे जेवड प्रगणे बडनेरा ता. व जि. अमरावती याची चर्तु:सिमा खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| पूर्वेस | :- शे.स.क्र. १२ |
| पश्चिमेस | :- रोड |
| उत्तरेस | :- रोड |
| दक्षिणेस | :- प्लॉट क्र. ४ |

शिक्का

**पत्ता :- ॲड. वैभव न काकिर्डे ॲन्ड,**
**१९, हरिओम कॉलनी, संताजी नगर,**
**अमरावती ९०७३८२१००१**